SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES-8 (TERM-II)
Subject - Marathi

std.7th

Prepared by: Renuka Joshi

LESSON- ८. जाऊ लंडन सफरीला

---

**पूर्व उपक्रम – तुम्ही भेट दिलेल्या कोणत्याही एका प्रेक्षणीय स्थळाची माहिती लिहा.**

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. लंडन शहराची प्रसिद्धी थोडक्यात लिहा.**

१. लंडन हे देशाचे उद्योग, आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र आहे . हे शहर शिक्षण, मनोरंजन, मिडीया , राजकारण, शिल्प यांसाठी जगात अव्वल आहे . न्यूयॉर्क व टोकियो शहरांसोबत लंडन हे जगातील सर्वात शक्तिशाली आर्थिक केंद्र आहे.

**२. लंडन शहरातील पाठात आलेल्या प्रसिद्ध ठिकाणांची नावे लिहा.**

२. बंकिंगहम पॅलेस, नॅशनल गॅलरी, सेंट पॉल्स कॅथेड्रल, ब्रिटीश म्युझिअम, टॉवर ब्रिज, लंडन आय , लंडन हीथ्रो विमानतळ ही लंडन मधील प्रसिद्ध ठिकाणं आहेत.

**प्रश्न २. रिकाम्या जागी पाठातील योग्य शब्द लिहा.**

**१. बंकिंग ह म पलेस येथे १८३७ मध्ये व्हिक्टोरिया राणीने राहण्यास सुरवात केली.**

**२. ब्रिटीश म्युझियममध्ये ८० लाखाहून अधिक वस्तू ठेवण्यात आले आहेत.**

**३. टावर ब्रिज हा थेम्स नदीवरील ऐतिहासिक व प्रसिद्ध पूल आहे.**

**४. हीथ्रो विमानतळ हे प्रवासी वाहतुकीसाठी जगातील सर्वात मोठे विमानतळ आहे.**

**५. ऑलिंपिक स्पर्धेचे तिसऱ्यांदा आयोजन करणारे लंडन हे जगातील एकमेव शहर आहे.**

**प्रश्न ३. पुढील प्रेक्षणीय स्थळाविषयी माहिती लिहा.**

१. बकिंगहम पॅलेस –१८३७ मध्ये व्हिक्टोरिया राणीने या प्रासादामध्ये राहण्यास सुरुवात केली. हा पॅलेस ब्रिटीश सम्राटांचे लंडनमधील अधिकृत निवासस्थान आहे.

२. सेंट पॉल्स कॅथेड्रल – इंग्लिश वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेले हे जगप्रसिद्ध चर्च लंडनमध्ये आहे .१७१० ते १९६३ पर्यत लंडनमधील सर्वाधिक ३६५ फूट (१११मी.) उंच असलेली ही वास्तू आहे

३. ब्रिटीश म्युझिअम :– हे लंडनमध्ये असलेले प्रसिद्ध संग्रहालय से ८० लाखाहून अधिक वस्तू येथे ठेवण्यात आल्या आहेत.१७५३ साली या भव्यदिव्य संग्रहालयाची स्थापना झाली. जगातील जवळजवळ सर्व देशांमधून आणलेल्या मौल्यवान वस्तू येथे ठेवण्यात आल्या आहेत.

४. लंडन्स आय – युरोपमधील सर्वात मोठा, प्रेक्षणीय आणि मजेशीर असा आकाश पाळणा ,याला 'लंडन्स आय ' म्हणतात. संपूर्ण शहराचे विलोभनीय दर्शन या ४४३ फूट उंच अशा या फिरत्या आकाश पाळण्यामधून करता येते. केबिन्स मधून निवांतपणे शहराचे सुंदर दृश्य बघता येते.

**प्रश्न ४. पुढील वाक्यांमधील विशेषण ओळखून लिहा.**

१) अनेक प्रसिद्ध चित्रकारांनी रेखाटलेल्या प्राचीन व सुंदर चित्रांचे दर्शन येथे होते.
विशेषण – प्रसिद्ध , प्राचीन,सुंदर.

२) इंग्लिश वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेले सेंट पॉल्स कथेडल हे जगप्रसिद्ध चर्च लंडनमध्ये आहे.
विशेषण – उत्कृष्ट , जगप्रसिद्ध

३)प्रेक्षणीय व मजेशीर असा युरोपमधील सर्वात मोठा आकाशपाळणा 'लंडन आय'हा लंडनमध्ये आहे.
विशेषण – प्रेक्षणीय,मजेशीर

४) लंडन शहराचे सौंदर्य या शहराचा इतिहास,येथील नाविन्यपूर्ण बदल अवर्णनीय आहे.
विशेषण – सौंदर्य , नाविन्यपूर्ण

**पाठानंतरचा उपक्रम**

**जगातील सात आश्चर्यांची नावे लिहा.**

**S.Teacher HOD Co –Ordinator Principal**